सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

**सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३**

# महाराष्ट्र देवदासी प्रथा (नाहीशी करणे) अधिनियम, २००५

(दिनांक १४ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

**Maharashtra Act No. XXXIII of 2006**

# The Maharashtra Devdasi System (Abolition) Act, 2005

*(As modified upto 14 November, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[किंमत : रु. ५-००]

# महाराष्ट्र देवदासी प्रथा (नाहीशी करणे) अधिनियम, २००५

## अनुक्रमणिका


| उद्देशिका | | पृष्ठे |
|---|---|---|
| कलमे | | |
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | ३ |
| २. | व्याख्या | ३ |
| ३. | देवदासी म्हणून समर्पण करणे बेकायदेशीर असणे. | ४ |
| ४. | देवदासीचा विवाह | ४ |
| ५. | नियंत्रण मंडळ | ४ |
| ६. | नियंत्रण मंडळाचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये | ५ |
| ७. | नामनिर्देशित सदस्य म्हणून अपात्र ठरवणे आणि अशा सदस्याला काढून टाकणे | ५ |
| ८. | जिल्हा समिती घटित करणे | ६ |
| ९. | जिल्हा समितीचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये | ७ |
| १०. | देवदासी प्रतिबंधक अधिकारी | ८ |
| ११. | अपराध व शास्ती | ८ |
| १२. | अपराधांची दखल | ९ |
| १३. | दखल घेण्यासाठी मुदत लागू नसणे. | ९ |
| १४. | न्यायचौकशीमध्ये अनुसरावयाची कार्यपध्दती | ९ |
| १५. | पोलिसांना मिळालेल्या माहितीची प्रत जिल्हा परिषदेकडे अग्रेषित करणे. | ९ |
| १६. | न्यायनिर्णयाची प्रत जिल्हा समितीला सादर करणे | ९ |
| १७. | दोषसिध्दी इत्यादीबाबतची वस्तुस्थिती प्रसिध्द करणे | १० |
| १८. | लोकसेवक | १० |
| १९. | सद्भावनापूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण | १० |
| २०. | नियम करण्याचा अधिकार | १० |
| २१. | अडचणी दूर करण्याचा अधिकार | १० |
| २२. | निरसन व व्यावृत्ती | ११ |

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३

# महाराष्ट्र देवदासी प्रथा (नाहीशी करणे) अधिनियम, २००५

[११ ऑगस्ट, २००६]

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ११ ऑगस्ट, २००६ रोजी प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम.)

**हिंदू देवता, मूर्ती, पूजा करावयाच्या प्रतिमा, देवळे किंवा धार्मिक संस्था यांना देवदासी म्हणून स्त्रिया अर्पण करण्याची प्रथा नाहीशी करण्यासाठी आणि अशा प्रकारे अर्पण करण्यात आलेल्या स्त्रियांचे शोषण होण्यापासून संरक्षण करण्यासाठी, आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी सर्वसमावेशक कायदा करण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** हिंदू देवता, मूर्ती, पूजा करावयाच्या प्रतिमा, देवळे किंवा धार्मिक संस्था यांना देवदासी म्हणून स्त्रिया अर्पण करण्याची राज्याच्या काही भागात अस्तित्वात असलेली प्रथा नाहीशी करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** अशा प्रकारची स्त्रियांचे शोषण करणारी देवदासींची प्रथा ही, त्यांच्या प्रतिष्ठेस कमीपणा आणणारी आहे ;

**आणि ज्याअर्थी,** अशी प्रथा नाहीशी करण्यासाठी आणि अशा देवदासींना आदरपूर्वक जीवन जगणे शक्य व्हावे म्हणून त्यांचे समाजात पुनर्वसन करण्यासाठी परिणामकारक उपाययोजना सुचविण्याकरिता महाराष्ट्र शासनाने एका अभ्यास गटाची नियुक्ती केली होती ;

**आणि ज्याअर्थी,** या अभ्यास गटाकडून करण्यात आलेल्या शिफारशी विचारात घेतल्यानंतर "देवदासी" प्रथा प्रभावीपणे नाहीशी करण्यासाठी आणि देवदासींना प्रतिष्ठापूर्वक जीवन जगणे शक्य व्हावे म्हणून देवदासींच्या या प्रथेस जबाबदार असणाऱ्या किंवा त्यात सहभागी असणाऱ्या व्यक्तींना शिक्षा करण्याकरिता कठोर भयोत्पादक शिक्षेची तरतूद करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी सर्वसमावेशक कायदा अधिनियमित करणे इष्ट वाटते ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र देवदासी प्रथा (नाहीशी करणे) अधिनियम, २००५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,-- व्याख्या.

(क) "नियंत्रण मंडळ" याचा अर्थ, कलम ५ अन्वये स्थापन केलेले देवदासी प्रथा नियंत्रण व निर्मूलन मंडळ, असा आहे ;

(ख) "समर्पण" याचा अर्थ, ज्याद्वारे एखादी स्त्री, स्वेच्छेने किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणतीही हिंदू देवता, मूर्ती, पूजा करावयाच्या प्रतिमा, देवळे किंवा धार्मिक संस्था यांच्या सेवेसाठी देवदासी किंवा जोगतीण म्हणून किंवा अन्य कोणत्याही नावाने समर्पित केली जाते, अशी कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी कोणतीही कृती किंवा समारंभ पार पाडणे, असा आहे ;

(ग) "देवदासी" याचा अर्थ, हिंदू देवतेस, मूर्तीस, पूजा करावयाच्या प्रतिमांस, देवळास किंवा धार्मिक संस्थांस, देवदासी किंवा जोगतीण म्हणून किंवा अन्य कोणत्याही नावाने समर्पित केलेली स्त्री, असा आहे ;

(घ) "देवदासी प्रतिबंधक अधिकारी" याचा अर्थ, कलम १० अन्वये नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे ;

(ङ) "जिल्हा समिती" याचा अर्थ, कलम ८ अन्वये स्थापन केलेली जिल्हा देवदासी प्रथा नियंत्रण समिती किंवा समित्या, असा आहे ;

(च) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(छ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(ज) "देऊळ" याचा अर्थ, धार्मिक पूजाअर्चा करण्याची जागा म्हणून समर्पित केलेली किंवा वापरली जाणारी जागा--मग ती कोणत्याही नावाने ओळखण्यात येत असो- असा आहे ; आणि

(झ) "स्त्री" याचा अर्थ, कोणत्याही वयाची स्त्री-जातीय व्यक्ती, असा आहे.

देवदासी म्हणून समर्पण करणे बेकायदेशीर असणे.

**३.** (१) हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी किंवा त्यानंतर, याविरुध्द कोणतीही रुढी, रिवाज किंवा कायदा असला तरी, कोणत्याहीं स्त्रीस देवदासी म्हणून समर्पण करण्यास मनाई आहे आणि तसे करणे बेकायदेशीर असल्याचे व परिणामशून्य असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

(२) कोणत्याही स्त्रीचे देवदासी म्हणून सपर्मण करण्यासंबंधी अशी कोणतीही कृती किंवा समारंभ पार पाडण्यात भाग घेणे, किंवा त्यास अपप्रेरणा देणे किंवा समर्पणासाठी प्रयत्न किंवा सिध्दता करणे, किंवा देवदासी प्रथेचा प्रसार करणे, यांस देखील याद्वारे मनाई करण्यात येत आहे व असे करणे बेकायदेशीर असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

देवदासीचा विवाह.

**४.** (१) याविरुध्द कोणतीही रुढी, रिवाज, नियम किंवा कोणताही कायदा असला तरी, एखाद्या देवदासी असणाऱ्या स्त्रीने केलेला विवाह, अशी स्त्री देवदासी आहे याच कारणामुळे केवळ विधिअग्राह्य असणार नाही आणि अशा विवाहातून जन्मणारे अपत्य हे अनौरस असणार नाही.

(२) एखादा पुरुष देवदासीबरोबर एकाच छत्राखाली पुरेशा दीर्घ काळापर्यंत पती-पत्नी म्हणून दांपत्यभावाने राहत असल्यास, प्रथमदर्शनी, त्या दोहोंमध्ये कायदेशीर व वैध विवाह अस्तित्वात असल्याचे गृहीत धरले जाईल आणि अशा दांपत्याच्या कोणत्याही संततीस, अशा व्यक्तींचे ज्या व्यक्तिगत कायद्यानुसार नियंत्रण होत असेल त्या कायद्यानुसार, अशा जोडप्याच्या संपत्तीमध्ये वारसाहक्क मिळण्याचा कायदेशीरपणे हक्क असेल.

नियंत्रण मंडळ.

**५.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून राज्यासाठी देवदासी प्रथा नियंत्रण व निर्मूलन मंडळ (यात, यापुढे ज्याचा निर्देश "नियंत्रण मंडळ" असा करण्यात आला आहे) म्हणून संबोधले जाणारे एक मंडळ स्थापन करील.

(२) नियंत्रण मंडळ पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :--

| | |
|---|---|
| (क) मुंबई उच्च न्यायालयाशी विचारविनियम करून शासनाने नियुक्त करावयाची, निवडश्रेणी जिल्हा न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली व जी न्यायाधीश आहे किंवा न्यायाधीश होती अशी व्यक्ती .. .. | अध्यक्ष ; |
| (ख) अध्यक्षास सहाय्य करण्यासाठी क्षमता, सचोटी आणि प्रतिष्ठा असलेल्या आणि महिलांच्या शोषणासंबंधीच्या समस्या सोडविण्याबाबत पुरेसे ज्ञान व अनुभव असलेल्या अशा, राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाच्या इतर दोन व्यक्ती, त्यांपैकी किमान एक व्यक्ती ही, राज्य महिला आयोगाशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेली महिला असेल .. .. | सदस्य ; |
| (ग) शासनाचे महिला व बालविकास आयुक्त .. .. .. | पदसिध्द सदस्य-सचिव. |

(३) नियंत्रण मंडळाच्या सदस्यांचा पदावधी पाच वर्षे इतका असेल.

(४) नियंत्रण मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही अन्यथा या अधिनियमाच्या तरतुदींनुसार असेल तर, नियंत्रण मंडळातील कोणतेही पद रिक्त असणे किंवा कोणत्याही सदस्याच्या नामनिर्देशनात कोणताही दोष असणे, याच केवळ कारणावरून ती विधिअग्राह्य असणार नाही.

(५) पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये सदस्य म्हणून वेळोवेळी करण्यात आलेल्या नियुक्त्या **राजपत्रामध्ये** प्रसिध्द करण्यात येतील.

(६) नियंत्रण मंडळाची बैठक, अध्यक्षास योग्य वाटेल अशा वेळी व अशा ठिकाणी होईल आणि तिचे कामकाज पार पाडण्यासंबंधात अध्यक्षास योग्य वाटेल अशा कार्यपध्दतीचे पालन करण्यात येईल.

(७) पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या अशासकीय सदस्यांना विहित करण्यात येतील असे शुल्क व भत्ते मिळतील.

नियंत्रण मंडळाचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये.

**६.** (१) नियंत्रण मंडळ, या अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, जिल्हा देवदासी प्रथा नियंत्रण समित्यांच्या आणि देवदासी प्रतिबंधक कार्यालयाच्या कामांचे पर्यवेक्षण करण्यासाठी प्रयत्नशील राहील आणि तसेच ते संपूर्ण राज्यातील देवदासींच्या विविध समस्यांचा अभ्यास करील आणि राज्यातील देवदासींच्या प्रथेचे प्रभावीपणे नियंत्रण व निर्मूलन करण्यासाठी त्याच्या मते, ज्या विविध सुधारणात्मक किंवा प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेणे गरजेचे असेल, अशा उपाययोजना शासनास सुचवील.

(२) नियंत्रण मंडळास, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी पुढील बाबतीत, दिवाणी न्यायालयाला, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खालील दिवाणी दाव्याची न्यायचौकशी करताना जे अधिकार असतात ते सर्व अधिकार असतील :--

१९०८ चा ५.

(क) कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठविणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणताही दस्तऐवज शोधून काढण्यास व सादर करण्यास फर्माविणे ;

(ग) शपथपत्रावर साक्षीपुरावा स्वीकारणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही सरकारी अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करणे ;

(ङ) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे ; आणि

(च) विहित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही बाबी.

(३) नियंत्रण मंडळाचे इतर अधिकार, कार्ये व कर्तव्ये विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(४) नियंत्रण मंडळ, या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी आणि सुरळीत अंमलबजावणी होण्याकरिता राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात येतील, अशा कोणत्याही निदेशांचे पालन करील.

नामनिर्देशित सदस्य म्हणून अपात्र ठरवणे आणि अशा सदस्याला काढून टाकणे.

**७.** (१) कलम ५ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये नामनिर्देशित केलेला अशासकीय सदस्य, जर असा सदस्य,--

(क) नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असणाऱ्या एखाद्या अपराधाबद्दल फौजदारी न्यायालयाने दोषी ठरविला असेल ; किंवा

(ख) विकल मनाचा असेल, आणि सक्षम न्यायालयाने तो असा असल्याचे घोषित केले असेल ; किंवा

(ग) अमुक्त नादार असेल ; किंवा

(घ) सदस्य म्हणून काम करण्यास नकार देत असेल किंवा सदस्य म्हणून काम करण्यास असमर्थ झाला असेल ; किंवा

(ङ) शासनाच्या मते सदस्य म्हणून राहण्यास अन्यथा अयोग्य असेल ;

तर, सदस्य म्हणून नामनिर्देशित केला जाण्यास किंवा असा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

(२) राज्य शासनास, जो नियंत्रण मंडळाचा सदस्य म्हणून पोट-कलम (१) अन्वये अपात्र असल्याचे आढळून आले आहे किंवा अपात्र ठरला आहे अशा सदस्यास काढून टाकता येईल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, अशा व्यक्तीस पोट-कलम (१) च्या खंड (घ) व (ङ) अन्वये काढून टाकण्यात येणार नाही.

जिल्हा समिती घटित करणे.

८. (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, योग्य वाटेल अशा जिल्ह्याकरिता किंवा जिल्ह्यांकरिता, जिल्हा देवदासी प्रथा नियंत्रण समिती (यात यापुढे जिचा निर्देश "जिल्हा समिती" असा करण्यात आला आहे) घटित करता येईल :

परंतु, एका जिल्ह्यासाठी घटित केलेल्या जिल्हा समितीच्या अधिकारितेमध्ये, एकापेक्षा अधिक जिल्हे असू शकतील व ती, त्या जिल्ह्यांसाठी जिल्हा समिती म्हणून काम करू शकेल.

(२) जिल्हा समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :--

| | |
|---|---|
| (क) ज्या जिल्ह्यासाठी किंवा जिल्ह्यांसाठी सामाईक जिल्हा समिती घटित केली असेल अशा कोणत्याही जिल्ह्याच्या मुख्य न्यायदंडाधिकारी. . | अध्यक्ष ; |
| (ख) अध्यक्षास सहाय्य करण्यासाठी क्षमता, सचोटी आणि प्रतिष्ठा असलेल्या आणि महिलांच्या शोषणासंबंधीच्या समस्या सोडविण्याबाबत पुरेसे ज्ञान व अनुभव असलेल्या अशा, राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाच्या तीन व्यक्ती, त्यांपैकी किमान एक व्यक्ती ही, राज्य महिला आयोगाशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेली महिला असेल . . | सदस्य ; |
| (ग) जिल्हा महिला व बालविकास अधिकारी . . . . | पदसिध्द सदस्य-सचिव. |

(३) प्रत्येक जिल्हा समितीच्या सदस्यांचा पदावधी, ती घटित केल्यापासून पाच वर्षे इतका असेल.

(४) जिल्हा समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही अन्यथा या अधिनियमाच्या तरतुदींनुसार असेल तर, तिच्यातील पद रिक्त असणे, किंवा कोणत्याही सदस्याच्या नामनिर्देशनामध्ये कोणताही दोष असणे, याच केवळ कारणामुळे ती विधिअग्राह्य ठरणार नाही.

(५) पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये सदस्य म्हणून वेळोवेळी करण्यात आलेल्या नियुक्त्या **राजपत्रात** प्रसिध्द करण्यात येतील.

(६) जिल्हा समितीची बैठक, अशा समितीच्या अध्यक्षास योग्य वाटेल अशा वेळी व अशा ठिकाणी घेण्यात येईल आणि तिचे कामकाज चालविण्यासंबंधात विहित करण्यात येईल अशा कार्यपध्दतीचे पालन करण्यात येईल.

(७) पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये नामनिर्देशित केलेल्या सदस्यांना, विहित करण्यात येईल असे शुल्क व भत्ते देण्यात येतील.

(८) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या अशासकीय सदस्यांना अपात्र ठरवणे किंवा त्यांना काढून टाकणे, या संबंधातील कलम ७ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये नामनिर्देशित केलेल्या जिल्हा समितीच्या सदस्यांना लागू होतील.

९. जिल्हा समितीचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये खालीलप्रमाणे असतील :-- जिल्हा समितीचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये.

(१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, समितीस,--

१९०८ चा ५. (क) पुढील बाबीसंबंधात दिवाणी न्यायालयास, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये असलेले सर्व अधिकार असतील,--

(एक) कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठविणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे ;

(दोन) कोणताही दस्तऐवज शोधून काढण्यास व सादर करण्यास फर्माविणे ;

(तीन) शपथपत्रावर साक्षीपुरावा स्वीकारणे ;

(चार) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही सरकारी अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करणे ;

(पाच) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे ; आणि

(सहा) विहित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही बाबी.

(ख) जेथे एखाद्या स्त्रीस देवदासी म्हणून समर्पित करण्यासाठी किंवा देवदासी म्हणून समर्पित करण्यात आल्यावर बंदी केले आहे किंवा बंदी करण्यात आले आहे असे मानण्यास जागा आहे किंवा जेथे या अधिनियमाखालील अपराधाचे कृत्य किंवा कृत्याची तयारी करण्यात येत आहे किंवा करण्यात येत असल्याचे मानण्यास जागा आहे, अशा कोणत्याही जागेची झडती घेण्याचा किंवा त्यासाठी अधिकार प्रदान करण्याचा अधिकार असेल ; आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यातील शोध घेण्याच्या व जप्त करण्यासंबंधीच्या तरतुदी या पोट-कलमाखालील शोधाच्या व जप्तीच्या बाबतीत, शक्य असेल तेथवर, लागू होतील. (१९७४ चा २.)

(२) (स्त्री) समर्पित करण्याच्या या अधिनियमाखालील अपराध करण्याबद्दल जबाबदार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेने देवदासींच्या निर्वाहाचा आणि पुनर्वसनाचा खर्च सोसण्यासंबंधातील जबाबदारी निश्चित करून त्याद्वारे, अशा देवदासींची अभिरक्षा व पुनर्वसन यांच्या संबंधात, त्यांच्याकडे विचारार्थ असलेल्या देवदासी विषयक कोणत्याही प्रकरणात यथोचित आदेश काढणे; हा आदेश, अधिनियमाच्या कलम ११ खाली अशा अपराधांच्या खटल्याची कोणतीही कारवाई सुरु झालेली असल्यास, किंवा होणार असल्यास, त्या कारवाईहून स्वतंत्र असेल.

(३) अशा देवदासी निराश्रित होऊ नयेत यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी, राज्य शासनाच्या योजनांनुसार, योग्य त्या प्रकरणामध्ये निर्वाह भत्ता देणे.

(४) देवदासी प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी आणि देवदासींच्या संरक्षणासाठी आणि पुनर्वसनासाठी, शासकीय योजनांनुसार किंवा स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर कोणतीही शासकीय अभिकरणे यांच्या योजनांनुसार, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, विविध उपाययोजना हाती घेणे.

(५) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे कोणत्याही धर्मादाय न्यासाची व्यवस्थापन समिती, या अधिनियमाखालील (स्त्री) समर्पित करण्याचा अपराध करीत असल्याचे या समितीस आढळून येईल तेथे, अशा न्यासाकरिता प्रशासक नेमण्याची शिफारस करणे आणि या अधिनियमाखालील कोणताही अपराध करण्याबद्दल दोषी असल्याचे आढळून आलेल्या न्यासाच्या कोणत्याही सदस्याच्या वैयक्तिक निलंबनाकरिता, किंवा यथास्थिति, संपूर्ण विश्वस्त समितीच्या, निलंबनाकरिताही शिफारस करणे.

(६) या अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी तिला योग्य वाटेल असा कोणताही आदेश काढणे.

(७) विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये आणि कर्तव्ये पार पाडणे.

देवदासी प्रतिबंधक अधिकारी. **१०.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, संपूर्ण राज्याकरिता किंवा त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्याच्या भागाकरिता किंवा भागांकरिता 'देवदासी प्रतिबंधक अधिकारी' म्हणून संबोधण्यात येणारा एक किंवा अनेक अधिकारी नियुक्त करू शकेल.

(२) देवदासी प्रतिबंधक अधिकाऱ्याचे पुढील कर्तव्य असेल,--

(एक) त्याच्या अधिकारक्षेत्रात कोणत्याही व्यक्तीकडून होणाऱ्या या अधिनियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनाचा, या अधिनियमान्वये त्यास योग्य वाटेल अशी कारवाई करून तपास लावणे आणि त्यास प्रतिबंध घालणे ; आणि अशी प्रकरणे संबंधित जिल्हा समितीला कळविणे ;

(दोन) या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लघंन करणाऱ्या व्यक्तींवर प्रभावीपणे खटले भरण्यासाठी साक्षीपुरावा गोळा करणे ; आणि तो संबंधित जिल्हा समितीला कळविणे ; आणि

(तीन) राज्य शासनाकडून, नियंत्रण मंडळाकडून आणि जिल्हा समितीकडून त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे आणि नियंत्रण मंडळाशी व संबंधित जिल्हा समितीशी समन्वय साधून काम करणे.

(३) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, देवदासी प्रतिबंधक अधिकाऱ्यांकडे अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे पोलीस अधिकाऱ्याचे अधिकार विनिहित करु शकेल आणि देवदासी प्रतिबंधक अधिकारी, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा मर्यादा व शर्तींना अधीन राहून, आपल्या अधिकारांचा वापर करील.

(४) प्रत्येक देवदासी प्रतिबंधक अधिकारी संबंधित जिल्हा समितीच्या अशासकीय सदस्यांना सहयोग देईल आणि त्यांच्याशी समन्वय साधून काम करील.

अपराध व शास्ती. **११.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर जी कोणतीही व्यक्ती,--

(क) आपल्या नियंत्रणाखालील कोणत्याही जागेत, देवदासी म्हणून एखाद्या महिलेला अर्पण करण्याचा कोणताही समारंभ किंवा कृती पार पाडील किंवा त्यास परवानगी देईल, त्यामध्ये सहभागी होईल किंवा त्यास अपप्रेरणा देईल किंवा तसे करण्यास मुभा देईल ती व्यक्ती, अपराधसिध्दीनंतर तीन वर्षांपर्यंत असू शकेल परंतु दोन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल, परंतु दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल :

परंतु, खंड (क) खालील अपराध जेव्हा त्या महिलेचे पालक किंवा तिचे भाऊ, बहीण, काका, काकी, मामा, मामी, आत्या, आतोबा यांसारख्या नातेवाईकांकडून घडला असेल तेव्हा, तो अपराधी किंवा ते अपराधी, अपराधसिध्दीनंतर, पाच वर्षांपर्यंत असू शकेल, परंतु जो दोन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीच्या

कारावासाच्या शिक्षेस आणि पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल, परंतु दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल किंवा असतील ; आणि

(ख) देवदासी प्रथेचा प्रचार करील ती व्यक्ती, अपराधसिध्दीनंतर, तीन वर्षांपर्यंत असू शकेल, परंतु एक वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि पन्नास हजार रुपयांपर्यन्त असू शकेल, परंतु दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(२) हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम यांच्या तरतुदींचे किंवा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये नियंत्रण मंडळाने किंवा जिल्हा समितीने दिलेले कोणतेही आदेश असल्यास, त्या आदेशाचे कोणतेही इतर उल्लंघन किंवा भंग, हा या अधिनियमाखालील अपराध ठरेल आणि असे उल्लंघन किंवा भंग करणारी दोषी व्यक्ती, खटला भरला जाण्यास पात्र होईल, आणि ती अपराध सिध्दीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या आणि दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

**१२.** कलम ११ च्या पोट-कलम (२) खालील अपराधांव्यतिरिक्त उक्त कलमाच्या पोट-कलम (१) खालील सर्व अपराध हे, दखलपात्र व अजामीनपात्र असतील. अपराधांची दखल.

(२) महानगर दंडाधिकारी किंवा न्याय दंडाधिकारी, प्रथम वर्ग, यांच्या न्यायालयाला दुय्यम असलेले कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करणार नाही.

१९७४ चा २. **१३.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या प्रकरण छत्तीसमधील कोणतीही गोष्ट या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधास लागू होणार नाही. दखल घेण्यासाठी मुदत लागू नसणे.

**१४.** या अधिनियमाखालील अपराधाची न्यायचौकशी करणारे प्रत्येक न्यायालय, शक्य असेल तितपत, ते प्रकरण प्राधान्याने निकालात काढील आणि संक्षिप्त कार्यपध्दतीचा अवलंब करील. न्यायचौकशीमध्ये अनुसरावयाची कार्यपध्दती

**१५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींखालील अपराध घडल्यासंबंधीची कोणतीही माहिती ज्याला प्राप्त झाली असेल अशा एखाद्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्याने, त्या माहितीची प्रत तात्काळ संबंधित जिल्हा समितीकडे सादर करणे, हे त्याचे कर्तव्य असेल. पोलिसांना मिळालेल्या माहितीची प्रत जिल्हा समितीकडे अग्रेषित करणे.

(२) अशी माहिती मिळाल्यानंतर, जिल्हा समिती, देवदासी प्रतिबंधक अधिकाऱ्याच्या समन्वयाने, या अधिनियमाखालील अपराधाच्या कृतीबद्दल गुन्हेगारांना जाब विचारला जाईल आणि त्यांच्यावर खटला भरण्यात येईल आणि त्यांना शिक्षा करण्यात येईल याची खात्री करण्यासाठी अशा प्रकरणी आवश्यक ती सर्व अनुवर्ती कारवाई करील.

**१६.** (१) या अधिनियमाखाली आरोपीवरील अपराधसिध्दी झालेले प्रकरण ज्या न्यायालयात दाखल करण्यात आले असेल ते प्रत्येक न्यायालय, आदेशाद्वारे, न्यायनिर्णयाची प्रत किंवा, यथास्थिति, त्याचा अंतिम आदेश, संबंधित जिल्हा समितीकडे ताबडतोब सादर करण्यास निदेश देईल. न्यायनिर्णयाची प्रत जिल्हा समितीला सादर करणे.

(२) सर्व संबंधितांकडून न्यायालयीन आदेशांचे योग्य अनुपालन होत आहे याची खात्री करण्यासाठी देवदासी प्रतिबंधक अधिकाऱ्याच्या समन्वयाने आवश्यक ती अनुवर्ती कारवाई करणे, हे संबंधित जिल्हा समितीचे कर्तव्य असेल.

(३) सर्व संबंधिताकडून न्यायालयीन आदेशाची योग्य अंमलबजावणी होत आहे याची खात्री करण्यासाठी जिल्हा समिती, दर तीन महिन्यांनी आपल्या अधिकार क्षेत्रातील सर्व प्रकरणांचा आढावा घेईल, आणि अनुपालनासंबंधीचा अहवाल नियंत्रण मंडळाला व शासनाच्या महिला व बाल विकास विभागाला देईल.

दोषसिध्दी इत्यादीबाबतची वस्तुस्थिती प्रसिध्द करणे.

**१७.** (१) या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधासाठी कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविण्यात आले असेल तेव्हा, त्या व्यक्तीला दोषी ठरविणारे न्यायालय, असे देवदासीचे समर्पण जेथे करण्यात आले होते त्या ठिकाणाच्या स्थानिक वृत्तपत्रात, अशा व्यक्तीचे नाव व निवासाचे ठिकाण तसेच त्याबरोबर, अशा गुन्ह्याबद्दल गुन्हेगाराला दोषी ठरविण्यात आले होते व त्याबद्दल त्यास शिक्षा करण्यात आली होती, ही वस्तुस्थिती आणि प्रकरणाच्या परिस्थितीनुसार, न्यायालयाला योग्य वाटेल असा इतर तपशील पोलिसांद्वारे प्रसिध्द करण्यास सक्षम असेल. अशा प्रसिध्दीपत्राची एक प्रत पोलिसांकडून महिला व बाल कल्याण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांना पाठवण्यात येईल.

(२) अशा आदेशाविरुध्द दाखल केलेले अपील (कोणतेही असल्यास) अंतिमरित्या निकालात काढण्यात येईपर्यंत, पोट-कलम (१) खाली कोणतीही प्रसिध्दी करण्यात येणार नाही.

लोकसेवक.

**१८.** नियंत्रण मंडळाचा व जिल्हा समितीचा प्रत्येक सदस्य आणि देवदासी प्रतिबंधक अधिकारी हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत, लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

सद्‌भावनापूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

**१९.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी शासन, शासनाचा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी किंवा कोणतीही व्यक्ती यांच्याविरुध्द कोणताही वाद, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

**२०.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, आणि पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीला अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि तो अशा प्रकारे ज्या अधिवेशनामध्ये ठेवण्यात आला असेल त्याच्या समाप्तीपूर्वी किंवा लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास, किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांची सहमती होईल, आणि ती तशा आशयाचा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर तो नियम, अशा अधिसूचनेच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२१.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवली तर, राज्य शासनास, **राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनाकरिता त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर या पोट-कलमान्वये असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

१९३४ चा मुंबई १०. **२२.** (१) मुंबई देवदासी संरक्षण अधिनियम, १९३४ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. निरसन व व्यावृत्ती.

१९०४ चा मुंबई १. (२) असे निरसन करण्यात आले असले तरीही, अशा निरसनापूर्वी, उक्त अधिनियमान्वये किंवा त्यास अनुसरून करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कारवाई ही अंमलात असण्याचे चालू राहील आणि मुंबई सर्वसाधारण वाकखंड अधिनियम, १९०४ याचे कलम ७, उक्त अधिनियमाच्या निरसनाला लागू असेल.

------------